**जिल्हाधिकारी मुंबई शहर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना परीक्षा आयोजनासाठी लागणारा खर्च करण्यासाठी "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- मलोआ ११२६/ प्र.क्र. १५०/ मलोआ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक – १२ जून, २०२६.

**वाचा** – १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीएससी १०८३/ ७६२/ के.नं.४६/ आठ, दिनांक ६ ऑगस्ट, १९८३,
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मलोआ १०००/९३०/प्र.क्र. ५२/ २०००/ आठ, दिनांक ६ डिसेंबर, २०००,
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मलोआ १०१४/ ९३१/ प्र.क्र. १४८/ आठ, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१४.

**प्रस्तावना** –

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध स्पर्धा परीक्षांसाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी परीक्षा केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. आयोगाच्या वतीने परीक्षांचे काम पार पाडण्याचे प्राधिकार संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असून त्यांना परीक्षेच्या कामाकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तथापि मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि नवी मुंबई येथे आयोजित परीक्षांचे कामकाज महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयामार्फत करण्यात येते.

राज्य शासनाच्या सेवेतील गट-अ व गट-ब (राजपत्रित), गट-ब (अराजपत्रित) आणि गट-क यासर्व संवर्गांची पदभरती आयोगामार्फत राबविण्याच्या दृष्टिने शासनाकडून घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने आयोगाच्या कामकाजामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. त्यामुळे आयोगामधील मर्यादित अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून सर्व जिल्हा केंद्रावरील आणि सोबतच मुंबई/ नवी मुंबई येथील परीक्षाकेंद्रावरील परीक्षांचे आयोजन करणे अत्यंत जिकिरीचे ठरणार आहे. त्यामुळे मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि नवी मुंबई येथे आयोजित परीक्षांचे काम जिल्हाधिकारी मुंबई शहर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना सोपविण्याबाबत तसेच जिल्हाधिकारी मुंबई शहर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना परीक्षा आयोजनासाठी लागणारा खर्च करण्यासाठी "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** –

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि नवी मुंबई येथील आयोजित परीक्षांचे काम जिल्हाधिकारी मुंबई शहर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना सोपविण्यात येत आहे. तसेच जिल्हाधिकारी मुंबई शहर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर

आणि विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना परीक्षा आयोजनासाठी लागणारा खर्च करण्यासाठी "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०२. उपरोक्त प्रमाणे जिल्हाधिकारी मुंबई शहर, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना परीक्षा आयोजनासाठी येणारा खर्च मागणी क्रमांक अ-३, सामान्य प्रशासन विभाग, २०५१ लोकसेवा आयोग, (१०२) राज्य लोकसेवा आयोग, (००) (०१) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (भारित) या लेखाशिर्षाअंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उपरोक्त अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात येणाऱ्या संबंधित वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानामधून भागविण्यात यावा.

०३. संबंधित अधिकारी त्यांना आवश्यक असणारी रक्कम संक्षिप्त देयकावर संबंधित जिल्हा कोषागारातून काढतील आणि खर्चाचे तपशीलवार देयक सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना प्रत्येक महिन्यास सादर करण्यास जबाबदार राहतील. सदर देयक तपासून त्यावर प्रति स्वाक्षरी केल्यानंतर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग ते देयक महालेखापाल मुंबई/ नागपुर यांच्याकडे महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ मधील तरतूदीनुसार पाठवतील.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०६१२१२११३२७७०७ असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SMITA PRASAD JOSHI

Digitally signed by SMITA PRASAD JOSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=d759e39e5163375d3782e5f6bef7edf6a25c72797123cdaa86acd09edf52baf1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=28AA5752FA66D3A7FDEAFB1F4AB24CD90FD9D667A6880CB8CCECA18276150ACA, cn=SMITA PRASAD JOSHI
Date: 2026.06.12 12:13:17 +05'30'

**( स्मिता जोशी )**
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवर, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
४. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
५. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
६. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
९. कोषागारी अधिकारी, ठाणे,
१०. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई,
११. जिल्हाधिकारी, मुंबई शहर,
१२. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर,
१३. कार्यासन – कोषा प्र-५, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. कार्यासन – अर्थसंकल्प, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. निवड नस्ती – कार्यासन- मलोआ.